# मुंबई विद्यापीठ

No. SW/07/of 2018

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यार्थी विकास विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'बी' रोड, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०
दूरध्वनी कमांक: ०२२ २२०४२८५९

## परिपत्रक

प्रति,
मा. प्रचार्य / संचालक / विभागप्रमुख,
संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ विभाग,
मुंबई विद्यापीठ

**विषयः राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दि. २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१८ या कालावधीसाठी विविध उपकम व कार्यकमांचे आयोजन**

संदर्भः उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक कमांकः संकीर्ण–२०१८ / प्र.क. ४३ / समन्वय, दि.: १४ सप्टेंबर २०१८

महोदय / महोदया,

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विविध उपकमांच्या आयोजनाबाबत केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री, मा. श्री. प्रकाश जावडेकर यांनी दिनांक ०७ / ०९ / २०१८ रोजी दुपारी २:०० वाजता सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश, शालेय व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच सर्व सचिव यांच्या समवेत व्हिडियो कॉन्फरन्सव्दारे बैठक घेतली. सदर बैठकीत मा. केंद्रीय मंत्री यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वर्षभराचा कार्यकम आयोजित करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

दिनांक २१ सप्टेंबर २०१८ रोजी मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्या सोबत झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे याबाबतचा तपशील सोबतच्या परिपत्रकात दिला आहे. वर्षभरातील उपकमाचा तपशील आपणास सविस्तर कळविला जाईलच तथापि, **दिनांक २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१८ या कालावधीसाठी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे उपकम व कार्यक्रम आयोजित करणे अनिवार्य व कमप्राप्त आहे.**

हे अभियान राबवताना केवळ राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रासेयो स्वयंसेवक व कार्यकम अधिकारी यांच्यावर उपकमांची जबाबदारी न टाकता या उपकमांमध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्याशाखांचे विद्यार्थी यांचा सहभाग करून घ्यावा, असे स्पष्ट निर्देश केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झाले आहेत. तरी आपण आपल्या महाविद्यालयात / परिसंस्थेत / विभागात विविध उपकमांचे आयोजन करावे.

आपल्या महाविद्यालयात / परिसंस्थेत / विभागात दि. २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत आयोजित केलेल्या सर्व उपकम व कार्यकमांचा छायचित्रासह अहवाल मा. संचालक, उच्च शिक्षण संचनालय **director.dhepune@nic.in** आणि **mavi.dhepune@nic.in** / मा. संचालक, तंत्र शिक्षण संचनालय व संचालक, विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ **deptstudentswelfare@gmail.com** यांना दिनांक ०३ ऑक्टोबर २०१८ पर्यत त्वरीत पाठवावा.

डॉ. सुनिल पाटील
संचालक

मुंबई
दिनांक: २१ सप्टेंबर २०१८

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती
निमित्त आराखडा तयार करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/ समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ सप्टेंबर,२०१८.

**शासन परिपत्रक :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विभागाने करावयाच्या कार्यवाही संदर्भात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री, मा.श्री.प्रकाश जावडेकर यांनी दिनांक ७/९/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश, शालेय शिक्षण व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच सर्व सचिव यांच्या समवेत व्हिडोओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. सदर बैठकीत मा.मंत्री (उ. व तं.शि.) व मा.सचिव (उ.व तं.शि.) हे हजर होते.

२. सदर बैठकीत मा.केंद्रीय मंत्री यांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या :-

१) महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.

२) स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.

३) दिनांक १५.९.२०१८ रोजी श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.

४) मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्राशी ज्या दुस-या राज्याची जोड (Pair State) ठरवून दिली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाण घेवाण (Student Exchange Programme) कार्यक्रम राबविणे.

५) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे/ भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

६) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रामध्ये (Community Centre) स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा.

७) महात्मा गांधीचा त्यांच्या जीवन कालावधीत महाराष्ट्रातील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा.वर्धा, पवनार, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करुन जनजागृती करावी.

८) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व

राष्ट्रीय स्तरावरील प्रसिध्द व्यक्तींना भाषणे (Lecture Series) देण्यासाठी आमंत्रित करावे.

९) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे (Wall Paintings) तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करावे.

१०) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधीच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करुन द्यावीत. तसेच, गुजरात, राजस्थान, बिहार इ. राज्यांनी महात्मा गांधीच्या विचारावर आधारीत काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत, ती सुध्दा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करुन देण्यात यावीत.

११) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

१२) बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिध्द केलेल्या "बापू की कहाणी" या पुस्तकाचे मराठीत भाषांतर करवून घेऊन ते पुस्तक सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये उपलब्ध करून देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१३) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावे.

१४) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली/ पदयात्रा वेळोवेळी आयोजीत कराव्या व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा.

४. तरी सर्व संबंधितांनी त्यांचे स्तरावर वरीलप्रमाणे कार्यवाही करुन आवश्यक तो आराखडा तात्काळ तयार करावा व सदर उपक्रम राबवून त्याचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. तसेच संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांनी या संपूर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण (monitoring and control) ठेवावे व अहवाल शासनास सादर करावा. तसेच या सर्व उपक्रमांचे छायाचित्र व व्हिडिओ यांना योग्य ती प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

द.रा.कहार

(द.रा.कहार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

सर्व कुलगुरु तथा सर्व कुल सचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
सर्व सह/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
संचालक, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय, मुंबई.
संग्रहार्थ.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**

Web : www.dirhe.org.in E-mail : info@dirhe.org.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्रमांक - उशिसं/परिपत्रक/२०१८/मवि-१ /16542 दिनांक — १७.०९.२०१८

19 SEP 2018

प्रति,

१. राज्य संपर्क अधिकारी,राष्ट्रीय सेवायोजना,मंत्रालय,मुंबई
२. संचालक, राष्ट्रीय सेवायोजना,सर्व अकृषि विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य
३. संचालक,विद्यार्थी विकास,सर्व अकृषि विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य
४. कुलसचिव,संस्कृत विद्यापीठ,रामटेक-नागपूर
५. कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक
६. कुलसचिव, गोखले राज्य व अर्थशास्त्र संस्था,पुणे
७. कुलसचिव,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे
८. कुलसचिव,डेक्कन कॉलेज,पुणे

**विषय- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आराखडा तयार करण्याबाबतची तातडीची बैठक.**

सदर्भ- १.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/समन्वय, दि.१४.९.२०१८
२.संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/मवि-१/२०१८/परिपत्रक/१२४००,दि.१५.९.२०१८
३.मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण यांचे दिनांक १८.९.२०१८ ची मंत्रालयीन बैठक

वरील संदर्भिय पत्रानुसार राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराचा कृती कार्यक्रम आयोजित करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सदरील सूचनेनुसार आपण तयार केलेल्या कृती आराखडयानुसार राज्यभरात एकसमान आराखडा तयार करुन संपूर्ण राज्यभर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

तरी या संदर्भात दिलेल्या सूचनेनुसार कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्याच्या दृष्टीने शिक्षण संचालनालयात **दिनांक २१.९.२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता** बैठकीचे आयोजन केलेले आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित रहावे.

**(डॉ.धनराज माने)**
संचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१

| Date | Activities | Themes | Origination |
|---|---|---|---|
| 24/09/2018 | Awareness | Swachhata Hi Seva | Clean street, Drain & Back Allay |
| 25/09/2018 | Publicity | Behavior Change respect of sanitation | Conduct Door to Door Meeting |
| 26/09/2018 | Painting | Swachhata | Wall painting By Slogan (University Level competition) |
| 27/09/2018 | Plastic free Society | Environment Conservation | Adopted Area/ college campus |
| 28/09/2018 | Competition | Gandhiji's Life and His Work | Elocution/ Debate Competition |
| 29/09/2018 | Lectures | Non- Violence | Call Eminent personalities |
| 30/09/2018 | campaign | Sanitation | Street Plays, Exhibitions etc. |
| 01/10/2018 | Awareness Campaign | De-addiction | Rallies with the Help of Mumbai sarvoday Mandal, Jain Foundation Jalgaon, Sevagram, pawanar etc. |
| 02/10/2018 | Gandhi Jayanti | Peace | Bhajan sandhy at Gate way of India And Stale Level Activities |

| दिनांक | उपक्रम | संकल्पना | आयोजनाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| २४/०९/२०१८ | जाणीव जागृती | स्वच्छता हीच सेवा | रस्ते, गल्ली व परिसर साफसफाई |
| २५/०९/२०१८ | व्यापक प्रसिद्धी | वर्तणूक परिवर्तन<br>स्वच्छतेचा आदर | गल्लोगल्ली व घरोघरी संपर्क अभियान |
| २६/०९/२०१८ | चित्रकला | स्वच्छता | विद्यापीठपातळीवरील स्पर्धेत सहभाग : भिंतीवर उद्बोधक विचार व चित्रमालिका रेखाटन स्पर्धा |
| २७/०९/२०१८ | प्लॅस्टिक मुक्त परिसर | पर्यावरण संवर्धन | दत्तक गावे किंवा महाविद्यालयीन परिसर |
| २८/०९/२०१८ | स्पर्धा | महात्मा गांधीजीचे जीवन व कार्य | वाद विवाद वक्तृत्व स्पर्धा |
| २९/०९/२०१८ | व्याख्यानमाला | अहिंसा | सुप्रतिष्ठित संसाधन व्यक्तींची व्याख्याने |
| ३०/०९/२०१८ | मोहिम/अभियान | स्वच्छता | पथनाटय, प्रदर्शन इत्यादी |
| ०१/१०/२०१८ | जाणीव जागृती अभियान | व्यसनमुक्ती | सर्वोदय मंडळ, मुंबई; जैन फाऊंडेशन, जळगाव; सेवाग्राम; पवनार आश्रम यांच्या सहकार्याने प्रभातफेरी |
| ०२/१०/२०१८ | गांधी जयंती | शांतता | भजन संध्या : महाविद्यालय, परिसंस्था व विद्यापीठस्तर |